# पोलीस आयुक्तालय, लोहमार्ग, मुंबई - ऑपरेशन मुस्कान

## दिनांक - ०१ एप्रिल २०१६ ते ३० एप्रिल २०१६

## मिळून आलेली मुले - १५६६, पालकांच्या ताब्यात दिलेली मुले-१४८१

लोकमत- 03 / 05 / 2016

### ऑपरेशन मुस्कान : रेल्वे पोलिसांनी मुलांना दिले पालकांच्या ताब्यात

## मुंबईच्या रेल्वे स्थानकांवर सापडली १,५६६ बालके

**मुंबई :** मुंबईचे आकर्षण, घरातील वाद, अभ्यासाचा कंटाळा आणि गर्दीत पालकांचा हात सुटून हरविणे इत्यादी कारणांमुळे रेल्वे स्थानकांवर १८ वर्षांखालील बालके (मुले-मुली) येत असतात. अशा बालकांचा शोध एप्रिल महिन्यात रेल्वे पोलिसांकडून (जीआरपी) 'ऑपरेशन मुस्कान'अंतर्गत घेण्यात आला आहे. तब्बल १ हजार ५६६ बालकांचा शोध रेल्वे पोलिसांनी घेतला. यामध्ये एकट्या मुंबई सेन्ट्रल स्थानकात ३४८ बालके सापडल्याची माहिती पोलिसांनी दिली.



त्यानंतर सीएसटी स्थानकाचा क्रमांक असून या स्थानकात २६१ तर वांद्रे स्थानकात २०२ बालके सापडली आहेत. सापडलेल्या एकूण बालकांपैकी १ हजार ४८१ बालकांना त्यांच्या पालकांच्या तर ८५ बालकांना बाल कल्याण समितीच्या ताब्यात देण्यात आले. या संदर्भात जीआरपीच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक (महिला कक्ष) मृदुला दिघे यांनी सांगितले की, ऑपरेशन मुस्कान अंतर्गत स्थानकांवर दिसणाऱ्या या मुला-मुलींची आम्ही कसून चौकशी करून त्यांना ताब्यात घेतो आणि त्यांच्याकडून माहिती घेऊन त्यांच्या पालकांच्या ताब्यात देतो.

### घरी रवाना

सापडलेल्या बालकांमध्ये १११८ मुले असून ४४८ मुली आहेत. १०४६ मुलांना तर ४३५ मुलींना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सापडलेल्या बालकांमध्ये मध्य प्रदेश, बिहारमधील बालकांचाही समावेश आहे. दुसऱ्या जिल्ह्यातील तसेच परराज्यातील मिळून आलेली ९५४ बालके आहेत.

महाराष्ट्र टाइम्स. 3.5.2016

## १५५६ मुलांना रेल्वेचा हात

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



**घर सोडलेल्या-चुकलेल्या मुलांना शोधण्याच्या मोहिमेला यश**

मुंबईच्या आकर्षणामुळे घर सोडलेली, कुटुंबातील भांडणांमुळे कंटाळून उंबरठा ओलांडलेली तर, कधी प्रवासात पालकांचा हात सुटलेली अशी असंख्य मुले अखेरीस रेल्वे स्टेशनांच्या आश्रयाला येतात. ही मुले कोणत्याही वाईट प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या जाळ्यात अडकू नयेत यासाठी सजग असलेल्या रेल्वे पोलिसांनी केवळ एप्रिल महिन्यात तब्बल १५५६ अल्पवयीन मुला-मुलींची सुटका केली आहे. त्यापैकी, १४८१ जणांना त्यांच्या पालकांकडे सुखरूप सोपवण्यात आले आहे.

रेल्वे पोलिसांकडून एप्रिलमध्ये राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत १५५६ मुले-मुली सापडली. सीएसटी ते पनवेल, खोपोली, कर्जत-कसारा, विरार ते चर्चगेट अशा सर्व रेल्वे पोलिस ठाण्यांच्या हद्दीत ही मोहीम राबविण्यात आली. आतापर्यंत मुंबई रेल्वे पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दरमहा साधारण १५० मुले-मुली सापडतात. यावेळी प्रथमच अशाप्रकारे विशेष मोहीम राबविण्यात आली. त्यासाठी महिला पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. रेल्वे हद्दीत सापडणारी मुले भांबावलेली असतात. अशावेळी त्यांना आधार देत, त्यांचे समुपदेशन करण्यासाठी महिला अधिकारी-कर्मचारी सज्ज असतात. त्याचपद्धतीने ही मोहीम हाताळण्यात आली. त्यामुळे चांगले यश मिळाल्याची प्रतिक्रिया महिला विभागाच्या प्रमुख पोलिस निरीक्षक मृदुला दिघे यांनी व्यक्त केली.

**स्टेशन परिसरात सापडलेल्यांची संख्या**

| | |
|---|---|
| सीएसटी | २६१ |
| दादर | १२४ |
| कुर्ला | ९६ |
| ठाणे | ७० |
| डोंबिवली | २७ |
| कल्याण | २१ |
| कर्जत | २१ |
| वडाळा | ३० |
| वाशी | २५ |
| पनवेल | ३८ |
| चर्चगेट | ५७ |
| मुंबई सेंट्रल | ३४८ |
| वांद्रे | २०२ |
| अंधेरी | ७६ |
| बोरीवली | ५२ |
| वसई | ७६ |

### परप्रांतीय मुलांचा भरणा जास्त

मुंबईत पळून येणाऱ्या अल्पवयीन मुला-मुलींमध्ये परप्रांतीयांचे प्रमाण जास्त आहे. रेल्वे पोलिसांकडून या मुलांना बालसुधारगृहात आश्रय दिला जातो. त्यानंतर त्यांच्या पालकांचा शोध घेत त्यांच्याशी संपर्क साधला जातो. त्यानंतर कायदेशीर प्रक्रियेनुसार पालकांकडे त्यांचा ताबा सोपविला जातो. सीएसटी येथे २६१ तर मुंबई सेंट्रल येथे ३४८ मुले सापडली.

**एप्रिलची आकडेवारी**

- एकूण १५६६ मुले-मुली सापडली
- मुलांची संख्या १११८
- मुलींची संख्या ४४८
- पालकांच्या ताब्यात दिली १४८१

# पोलीस आयुक्तालय, लोहमार्ग, मुंबई - ऑपरेशन मुस्कान

## दिनांक - ०१ एप्रिल २०१६ ते ३० एप्रिल २०१६

## मिळून आलेली मुले - १,५६६ - पालकांच्या ताब्यात दिलेली मुले- १,४८१

### रेल्वे पोलिसांच्या ऑपरेशन मुस्कानला चांगले यश

# दीड हजारांहून अधिक कुटुंबांतील हास्य परतले



मुंबई : वेगवेगळ्या कारणांवरून घर सोडून मुंबई नगरीत पळून आलेली किंवा हरवलेल्या लहानग्यांना रेल्वे हद्दीतून ताब्यात घेऊन त्यांच्या पालकांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या स्वाधीन करण्याचा उपक्रम रेल्वे पोलिसांकडून 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत राबविण्यात येत आहे. याला आतापर्यंत चांगले यश आले असून १५६६ मुलांना स्वगृही पाठवण्याची किमया रेल्वे पोलिसांनी केली आहे.

पुण्य नगरी . 03/05/2016

मुंबई मंगळवार, ३ मे २०१६ | पुढारी महाराष्ट्र

# रेल्वे स्थानकांवर हरवलेल्या दीड हजार मुलांचा शोध

## १ हजार ४८१ मुले दिली पालकांच्या ताब्यात; शोध मोहीम सुरूच राहणार!

मुंबई : प्रतिनिधी



**मुस्कान विषयी...**

**मुस्कानचे अभूतपूर्व यश; ३४ मुलांना शोधले**

# MUMBAI RAILWAY POLICE COMMISSIONERATE

## OPERATION MUSKAN- 1 APRIL 2016 TO 30 APRIL 2016

## RESCUED KIDS- 1,566

MUMBAI MIRROR -3-5-2016



# Smile, GRP rescued 1,566 kids in 30 days

**Operation Muskan has seen 52 children being saved daily; the maximum number of lost children were spotted at Mumbai Central and CST**

Mumbai Mirror Bureau
@timesgroup.com
TWEET @MumbaiMIRROR

The Government Railway Police have rescued 1,566 kids in 30 days under operation Muskan—52 children a day. Four hundred and forty eight of these children have been girls, 1118 have been boys. Most of these children have been returned to their families, 78 were handed to the Child Welfare Committee. Mumbai Central topped the list of stations, with 348 kids being found there, followed by 269 at CST.

The GRP formed special teams of women constables to keep an eye out for children wandering on stations. According to a GRP official, most of these kids were found at CST and Mumbai Central because they were 'terminating and originating' stops. Several kids would also run away from their home and come to Mumbai for the glamour of Bollywood.

A 9-year old boy who was later identified as Chandan Vinaykumar Shrivastav was found aimlessly roaming around Koparkhairane railway station by commuters on April 26. The commuters who found him handed him over to the GRP. Chandan could not communicate as he was mute.

The GRP started a search for his family and traced his house relying on his actions and expressions. Chandan was then handed over to his parents after a search that lasted a couple of hours.



Chandan Shrivastav (C) was reunited with his family

# Drive by rly cops reunites 1,500 kids with their families

Times of India - 3-5-2016

**Mumbai:** The railway police has managed to track down 1,566 missing children as part of "Operation Muskan", carried out between April 1 to 30. In all, the police has managed to identify the whereabouts of 1,481 children and succeeded in reuniting them with their parents from across the city, state and some from Gujarat and Madhya Pradesh. The drive that was started under instructions from the central government was aimed at tracking down and rescuing juveniles in child labour, found begging or abandoned on the streets or those who had run away from homes. An officer and three personnel, mostly women cops, from each of the 17 railway police stations underwent training before the drive.

Interestingly, in one of the cases cops managed to get whereabouts of a 9-year-old deaf mute boy through sign language after taking him to a cop's home. "The boy-Chandan Shrivastav-resident of Koparkhairane in Navi Mumbai was spotted at Sanpada railway station by some passengers who brought him to the attention of constable D D Rathod. Rathod took the boy and after inquiring in sign language managed to get his whereabouts and reunited him with his parents," said a railway police officer.

Many of the rescued kids had run away from home while some got separated from parents while boarding trains. "Of the 1,566 kids rescued from Central, Harbour and Western lines, 1,118 were boys while 448 were girl. In all, 1,046 boys and 435 girls have been united with parents. The others have been sent to children homes after taking court orders," Mumbai railway police commissioner, Madhukar Pandey told **TOI**.



Chandan after being rescued

"The drive was carried out from CST to Panvel (Harbour), CST to Karjat (Central) and Churchgate to Palghar (Western) for 30 days in April," said assistant police inspector Mrudula Dighe. She said they presented these kids before the child welfare committee (CWC) and waited for 24 hours.